# उप वनसंरक्षक, अलिबाग वन विभाग, अलिबाग यांचे कार्यालय

मु.पो.ता.अलिबाग जि. रायगड पीन नं. 402201, फोन नं. 02141-222016, ईमेल dycfalibag@mahaforesg.gov.in

पत्र

विषयः- उरण चाकण शिक्रापुर एल.पी.जी. पाईपलाईन ऑप्टीकल फायबर केबल लाईन टाकणेसाठी वनक्षेत्र मागणी प्रस्ताव क्षेत्र 9.4040 हेक्टर अंतर्गत अतिरिक्त वनक्षेत्र मागणी प्रस्ताव.. क्षेत्र 0.8878 हेक्टर

जावक क्र. ब/20/जमिन/ 358/ /2016-17.
अलिबाग - 402 201, दिनांकः- 3/11/2016

प्रति,

मुख्य व्यवस्थापक,
एल्.पी.जी. प्रोजेक्ट,
हिंदूस्थान पेट्रोलियम कार्पोरेशन लि.
8, सुरजी वल्लभदास मार्ग, पोस्ट बॉक्स नं. 155,
मुंबई- 400 001.

संदर्भः- आपलेकडील पत्र क्र. PROJ/BSC दिनांक 10/10/2016.

उरण चाकण शिक्रापुर एल.पी.जी. पाईपलाईन व ऑप्टीकल फायबर केबल लाईन टाकणेसाठीचे 9.4040 हेक्टर वनजमिन मागणीचे प्रस्तावास केंद्रशासनाने मान्यता प्रदान केलेली आहे. सदर पाईपलाईन व ऑप्टीकल फायबर केबल करीता मंजूर करण्यात आलेल्या आखणी मार्गामध्ये बदल होत असल्याने आपणाकडून अतिरिक्त 0.8878 हेक्टर वनक्षेत्र मागणी प्रस्ताव संदर्भिय पत्रान्वये या कार्यालयात दाखल केला आहे.

सदर प्रस्तावाची छाननी केली असता, ऑन लाईन प्रणालिवर दाखल करण्यांत आलेले आखणी मार्गाचे नकाशे व प्रत्याक्षांत प्रस्तावांत सामिल करण्यांत आलेले नकाशांमध्ये तफावत असल्याचे आढळून आलेले आहे. तरी प्रत्यक्षांतील कोणता आखणी मार्ग योग्य आहे याबाबत स्पष्टीकरण होणे आवश्यक आहे. सोबत प्रस्तावाचे संच जोडले आहेत.

तरी वरील त्रुटीची पूर्तता करुन परिपूर्ण प्रस्ताव दाखल करणेस विनंती आहे.

सहपत्रः- वरील प्रमाणे.

उप वनसंरक्षक,
अलिबाग.

D:\LAND 3\2015-16\FCAct\HPCL Dighati proposal\HPCL Dighati proposal.doc